प्रेस नोट दिनांक. १२/०३/२०२४

**आरोपी लोकसेवक मोहन सुरेशराव देशमुख , वय ४८ वर्षे, पद कृषी पर्यवेक्षक (वर्ग ३),तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गंगाखेड जि.परभणी ३०००/- रूपयांची लाच स्विकारताना अॅसीबी,परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.गंगाखेड,जि. परभणी गु.र.न. १३० /२०२४<br>कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | मोहन सुरेशराव देशमुख , वय ४८ वर्षे, पद कृषी पर्यवेक्षक (वर्ग ३), तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी सध्या रा.गणेश नगर, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रू. |
| लाचेची स्विकारली रक्कम | ३,०००/- रू. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे पुतणे यांची राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत रोटावेटर साठी ऑनलाईन सोडत मध्ये निवड झाली आहे. रोटावेटर खरेदीसाठी 'पूर्वसंमती पत्र' त्यांना तालुका कृषी अधिकारी गंगाखेड यांच्याकडून प्राप्त झाले आहे. तक्रारदार यांचे पुतण्या यांनी रोटावेटर खरेदी केले आहे. त्याची पाहणी करून फोटो वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी आलोसे यांनी दिनांक २१/०२/२०२४ रोजी त्यांचे गावी भेट देऊन खरेदी केलेल्या रोटावेटर चे फोटो काढले व तक्रारदार यांना म्हणाले,''मी तुमचे मोठे काम केले आहे, यापूर्वी पण तुमचे भावाला अनुदानावर मिळालेल्या ट्रॅक्टरचे फोटो काढून वेबसाईटवर अपलोड केले आहेत. तेव्हा तुम्ही मला येऊन भेटतो असे म्हणाले होते. परंतु तुम्ही येऊन भेटला नाहीत'' असे म्हणून ट्रॅक्टर व रोटावेटर चे फोटो वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी आणि अनुदानाची रक्कम बँक खात्यावर टाकण्यासाठी लाचेची मागणी केली आहे.<br>तक्रारदार यांनी एसीबी परभणी येथे दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०५/०३/२०२४ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान आलोसे मोहन देशमुख यांनी अनुदानावर मंजूर झालेल्या रोटावेटर आणि ट्रॅक्टरच्या केलेल्या कामासाठी तक्रारदार यांचेकडे ३,०००/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली आहे.दि.१२/०३/२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे मोहन देशमुख यांनी पंचासमक्ष ३,०००/- रू लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे. |
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक, श्री.सदानंद वाघमारे,पोलीस निरीक्षक, पोह/निलपत्रेवार, पोशि/बेद्रे, पोशि/मो.जिब्राईल शेख, पोशि/नागरगोजे,चापोह/कदम, नरवाडे यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री.सदानंद वाघमारे,पोलीस निरीक्षक, लाप्रवि युनिट परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
|---|---|
| दुरध्वनी क्र 02452220597 टोल फि 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharastra.net |
| डॉ.राजकुमार शिंदे,<br>पोलीस अधीक्षक,अॅसीबी नांदेड परिक्षेत्र, नांदेड<br>9623999944 | श्री.अशोक इप्पर,<br>पोलीस उप अधीक्षक,अॅसीबी, परभणी युनिट<br>9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | (Twitter) : @ACBPARBHANI |
| Instagram : acbparbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |

(अशोक इप्पर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी.